# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल: rahuri.amfu@gmail.com

**२२) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १३/०५/२०२१**

**जिल्हा : धुळे**

| मागील आठवड्यातील हवामान (०६/०५/२०२१ ते १२/०५/२०२१) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानअंदाज (१४/०५/२०२१ ते १८/०५/२०२१) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०६ | ०७ | ०८ | ०९ | १० | ११ | १२ | दिनांक | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| | | | | | | | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ११ |
| | | | | | | | कमाल तापमान (अं.से.) | ३८ | ३९ | ४१ | ४१ | ४० |
| | | | | | | | किमान तापमान (अं.से.) | २५ | २८ | ३१ | ३२ | २७ |
| | | | | | | | ढगस्थिती (आकाश) | ६ | ८ | ८ | ८ | ८ |
| | | | | | | | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ५० | ४८ | ३२ | ४० | ६१ |
| | | | | | | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | १६ | १७ | १४ | २१ | ३३ |
| | | | | | | | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | १७ | १३ | ११ | २९ | ३५ |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | **पुढील पाच दिवस आकाश काही ठिकाणी अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. दि. १८ मे रोजी जोराचे वारे व विजाच्या कडकडाटा सह काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.** |
| सामान्य सल्ला | | **पावसाची शक्यता असल्याने, कापणी केलेली पिके शेडमध्ये किंवा प्लास्टिकच्या कागदाने झाकून ठेवावीत.<br>पिकाची काढणी शक्यतो सकाळचे वेळेतच करावी.<br>वादळी वाऱ्याची शक्यता असल्याने, फळ पिकाचे संरक्षण करण्यासाठी बांबू किंवा लाकडी काड्यांचा आधार देऊन प्लॅस्टिक दोरीच्या सहाय्याने झाडे एकमेकांना बांधून घ्यावीत.<br>पावसाच्या शक्यतेमुळे, विद्युत उपकरणाचा संपर्क टाळा.<br>जनावराना उघड्यावर चरावयास पाठवु नये, तसेच त्याच्याकडे बारकाईने लक्ष द्यावे तसेच झाडाखाली बांधु नयेत. जनावरे गोठ्यात बांधावीत आणि चारा उपलब्ध करुन द्यावा. शेडमध्ये पाणी साचू नये याची काळजी घ्यावी. जर पाणी साठलेल्या कोरड्या चार्यावर पडले आणि बुरशीचे आक्रमण आढळले तर तो चारा जनावरांना देवु नये.<br>शेतातील कामे शक्यतो टाळावीत.<br>हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>वीजेच्या अंदाजाचा पूर्वानुमानाकरीता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा.** |
| संदेश | | **पुढील पाच दिवस आकाश काही ठिकाणी अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. दि. १८ मे रोजी जोराचे वारे व विजाच्या कडकडाटा सह काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.** |
| पाण्याचे पूर्नभरण | | चर, विहीर, तलाव यामधील गाळ किंवा ते काढून घ्यावेत. तसेच पाणी जमिनीत जास्तीत मुरेल व वाहून जाणार नाही याचा प्रयत्न करावा. पावसाचे घराच्या छतावर पडणारे पाणी पाइपद्वारे एखाद्या टाकीत जमा करावे व त्याचा वापर विहिर पुर्नभरण किंवा बोअरवेल पूर्नभरण करुन घ्यावे. |
| सोयाबीन | उगवणक्षमता तपासणी | सोयाबीन पिकाची पेरणी करण्यापूर्वी त्याची उगवण क्षमता तपासूनच पेरणी करावी.<br>उगवणक्षमता तपासणी करण्याकरिता गोणपाट अथवा वर्तमानपत्राचा कागद वापरावा. एका ओळी मध्ये दीड ते दोन सेंटिमीटर अंतरावर १० दाणे ठेवावे , अशाप्रकारे दहा ओळींमध्ये एकूण १०० दाणे व्यवस्थित रांगेत ठेवावे.<br>त्यानंतर गोणपाटावर अथवा वर्तमानपत्रावर पाणी टाकून ओले करावे व ते गोल गुंडाळून थंड ठिकाणी सावलीत ठेवावे. अधून मधून त्यावर पाणी शिंपडत रहावे. सहा ते सात दिवसानंतर कोंब आलेले दाणे वेगळे करून मोजावे. जर उगवण झालेले बियाण्यांची सरासरी संख्या ७० पेक्षा कमी असेल तर एकरी बियाण्यांचे प्रमाण थोडे वाढवून पेरणी करावी.<br>पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करावी. |
| खरीप नियोजन | | पूर्व मशागत झालेली असल्यास पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्यासाठी मध्यम जमिनीत वाफे आणि भारी जमिनीत सरी वरंबे करावेत. खरीप हंगामात भाजीपाल्याची लागवड करण्यासाठी ज्याच्याकडे पाण्याची सुविधा आहे त्यांनी रोपे तयार करण्यासाठी रोपवाटीका तयार करावी. आपल्या शेतातील |

# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल: rahuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| | | मातीचा नमुना त्यात अन्नद्रव्याचे प्रमाण, जमिनीचा आम्ल विम्ल निर्देशांक म्हणजेच सामू तपासून जामीनीबाबाताचे माहिती घेणे आवश्यक आहे. खरीप हंगामातील पिकांच्या पेरणीसाठी दर्जेदार व प्रमाणित बियाण्याचे नियोजन करावे. |
| उन्हाळी भुईमूग | परिपक्वता | पीक तयार झाले म्हणजे पाने पिवळी पडू लागतात. शेंगाचे टरफल टणक बनते व शेंगाच्या टरफलाची आतील बाजू काळी दिसू लागते. त्यानुसार काढणीची तयारी करावी. |
| कांदा | काढणी | १) कांद्याची काढणी करीताना हाताने कांदे उपटावेत व कांद्याच्या जुडी बांधाव्यात.<br>२) कांद्याच्या मानेपासून २ सेमी वर पात कापावी. |
| Covid 19 च्या महामारीच्या परिस्थिती घ्यावयाची काळजी | | १) शेतामधील कापणी आणि इतर कामांसाठी शक्यतो यंत्राचा वापर करावा आणि जास्त गर्दी किंवा एकत्रित काम करणे टाळावे. शेती यंत्रे निर्जंतुकीकरण करावीत.<br>२) शेतामध्ये काम करत असताना शेतकरी बांधवांनी सामाजिक अंतर पाळावे तसेच तोडाला मास्क किंवा स्वच्छ रुमाल बांधावा , वेळोवेळी निर्जंतुकीकरण करणारे रसायन किंवा साबण यांनी हात स्वच्छ धुवावेत.<br>३) शेतामध्ये काम करतेवेळी आपल्या हाताचा डोळे , तोंड आणि नाक यांना स्पर्श होणार नाही याची दक्षता घ्यावी.<br>४) शेतीचे कामे करताना कामगाराना ४ ते ५ फुटाचा पट्टा वाटून दिल्यास काम पण योग्य होइल आणि योग्य सामाजिक अंतरही ठेवले जाईल. |
| आधुनिक सिंचन पद्धती | | प्रवाही सिंचन पद्धतीत शेतचारीतून ३० ते ४०% पर्यंत होणारा पाण्याचा अपव्यय टाळता येतो. ज्या जमिनीचा पाणी झिरपण्याचा वेग जास्त आहे , अशा जमिनीत आधुनिक सिंचन पद्धतीचा अवलंब फायदेशीर ठरतो. सरी, वरंबे व चारी खालील जमिन वाया जात नसल्यामुळे जवळपास १६% जास्तीचे क्षेत्र वापरता येते. आधुनिक सिंचन पद्धतीचा अवलंब करून नेमकेच पाणी दिल्याने पाण्याचा निचरा खोलवर होत नाही व जमिनीची धूप होत नाही, तसेच, या पद्धतीद्वारे रासायनिक खते देणे शक्य असते. पाणी वापरातील बचत ५०% पर्यंत व उत्पादनातही लक्षणीय वाढ होते. तणांचे प्रमाण , कीड व रोगांचा प्रादुर्भाव कमी होतो. तुषार सिंचनात क्षारयुक्त पाण्याचा वापर करणे शक्य असते , तुषार सिंचनानंतर पाऊस पडला तरी पिकांवर अनिष्ठ परिणाम होत नाही. कमी वेळेमध्ये जास्त क्षेत्रावर सिंचन करता येते. पाण्याच्या कमतरतेनुसार पाण्याचा कार्यक्षम वापर होण्यासाठी आधुनिक सिंचन पद्धतींचा वापर ( ठिबक सिंचन व तुषार सिंचन) पीकनिहाय वेगवेगळ्या स्वरूपांत करावा. त्यामुळे पाण्याची बचत होऊन जमिनीचा पोत सुधारतो तसेच आधुनिक सिंचन पद्धतीचा वापर न केलेल्या पिकांच्या तुलनेत १००% उत्पादनात वाढ दिसून येते आणि उत्पादित होणाऱ्या मालाची गुणवत्ता व प्रत देखील उल्लेखनीय असते. |

स्त्रोत :
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान :

ठिकाण : मफुकृवि , राहुरी.
दि. : १३/०५/२०२१

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**
**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**